# जाहिरात
## महाराष्ट्र शासन
## वनविभाग
## मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),यवतमाळ
## डॉ.बाबासाहेब आंबेडकर,सामाजिक न्याय भवन, पोलीस कवायत मैदानचे बाजुला, यवतमाळ - ४४५००१

जाहिरात क्रमांक/कक्ष-/आस्था/सरळसेवाभरती/ / दिनांक .....सप्टेंबर,२०१६
(अर्ज फक्त ONLINE पद्धतीनेच स्विकारण्यात येतील)

**वनरक्षक या संवर्गातील मुख्य वनसंरक्षक (प्रादे.) यवतमाळ यांचे आस्थापनेवरील रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात**

**वनरक्षक** पदावर नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता धारण करित असलेल्या उमेदवारांकडून दिनांक **११/१०/२०१६** पर्यंत Online पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सुचना व भरावयाचे अर्ज maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने संपुर्ण जाहिरात व अनुषंगीक सुचना काळजीपुर्वक वाचाव्यात.

वनरक्षक संवर्गातील रिक्त पदसंख्या, वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, शारिरीक पात्रता, ईत्यादिचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**१.१ सरळसेवा वनरक्षक पदसंख्या - ३१+८ = ३९**

**यवतमाळ वनवृत्तातील अनुसुचित क्षेत्राबाहेरील कार्यक्षेत्रा करीता वनरक्षक संवर्गातील भरती करावयाच्या पदसंख्येचा तपशिल समांतर आरक्षणासह खालील प्रमाणे आहे.**

**भरती करावयाच्या उल्लेखित वनरक्षकांच्या पदांकरिता प्रवर्ग निहाय पदसंख्या**

| विशेष/समांतर आरक्षण | अजा | विजा-अ | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| महिला ३०% | १ | ० | २ | ७ | १० |
| प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त ५ % | ० | ० | ० | १ | १ |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक १५% | ० | ० | १ | ३ | ४ |
| अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडू ५% | ० | ० | ० | १ | १ |
| होमगार्ड ५% | ० | ० | ० | १ | १ |
| अंशकालीन उमेदवार १०% | ० | ० | १ | २ | ३ |
| वनमजूर १०% | ० | ० | १ | २ | ३ |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | ५ | ८ |
| एकूण | २ | १ | ६ | २२ | ३१ |

यवतमाळ जिल्हयातील स्थानिक अनुसुचित क्षेत्रातील वनरक्षकांच्या भरती करावयाच्या पदांचा समांतर आरक्षणसह तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| विशेष/समांतर आरक्षण | अनु.जमाती प्रवर्ग | एकूण |
|---|---|---|
| महिला ३३% | ३ | ३ |
| प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त ५% | ० | ० |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० |
| माजी सैनिक १५% | १ | १ |
| अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडू ५% | ० | ० |
| होमगार्ड ५% | ० | ० |
| अंशकालीन उमेदवार १०% | १ | १ |
| वनमजूर १०% | १ | १ |
| सर्वसाधारण | २ | २ |
| **एकूण** | ८ | ८ |

**विशेष टिप - (१)** या जाहिरातीमध्ये उक्त नमुद केलेली पदसंख्या दिनांक ३१/१२/२०१६ पर्यंत रिक्त होणा-या पदावर आधारीत असल्याने प्रत्यक्ष नियुक्ती उक्त दिनांकापर्यंत रिक्त पदांच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. तसेच उक्त पदसंख्येत व आरक्षणाच्या प्रमाणात ही जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर या संदर्भात शासनाकडून निर्गमीत होणा-या निर्देशाच्या अधीन राहून बदल होऊ शकतो.

(२) अनुसुचीत क्षेत्राअंतर्गत येणारी वनरक्षक या संवर्गातील पदे ही अनुसुचीत क्षेत्रातील स्थानीक उमेदवारामधुनच भरण्यात येतील. अनुसुचीत क्षेत्राबाहेरील अनुसुचीत जमातीचे उमेदवारांनी या पदासाठी केलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत. तसेच या वर्गवारी अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांची पदस्थापना केवळ याच अनुसुचीत क्षेत्रातील पदावर करण्यात येईल. त्यांची पदस्थापना अनुसुचीत क्षेत्राबाहेर कधीही होणार नाही.

(३) शासन अधिसुचना क्रमांक:आरबी/टीसी/ई-१३०१३(४)/नोटीफिकेशन-१/४७४/२०१४, दिनांक ९ जून २०१४ नुसार स्थानीक अनुसुचीत जमातीचे उमेदवार म्हणजे जे अनुसुचीत जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई वडील किंवा आजी आजोबा संबंधीत जिल्हयाच्या अनुसुचीत क्षेत्रामध्ये (यवतमाळ जिल्हयातील अनुसुचीत क्षेत्रात) दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत आहेत असा. (यवतमाळ जिल्हयातील अनुसुचीत क्षेत्राअंतर्गत येणा-या गावांची यादी सोबत जोडण्यात आलेली आहे.)

**२. वेतनश्रेणी :-** (रु.५२००- रु.२०२००, ग्रेड वेतन- रु.१८००/-)

**३. शैक्षणिक पात्रता :-**

**३.१** उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १२ वी) (विज्ञान किंवा गणित किंवा भूगोल किंवा अर्थशास्त्र या विषयासह १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.)

३.२ **शासन निर्णय क्रमांक:आरटीए-१०८२-२३२७-सीआर-६३-१६-अ, दिनांक ५ ऑक्टोंबर, १९८९ नुसार एसएससी उत्तीर्ण आणि कमीत कमी सेवा १५ वर्षे सेवा झालेल्या व ज्याच्याजवळ सैन्यसेवेतील पदवी प्रमाणपत्र आहे असे माजी सैनिक वनरक्षक पदासाठी पात्र ठरतील. या बाबत शासन पत्र क्रमांक:एफएसटी ११/१३/प्रक्र६१८/फ-४, दिनांक ६ मार्च २०१४ नुसार माजी सैनिकांसाठी वनरक्षक पदासाठी इयत्ता १० चे गुण विचारात घेण्यात येऊन निवड यादया तयार करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.**

३.३ अनुसुचीत जमाती च्या उमेदवारांसाठी शैक्षणिक अर्हता १० वी उत्तीर्ण राहील.

**३.४** नक्षलवाद्याच्या हल्ल्यात मरणपावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचा-यांच्या मुलांसाठी शैक्षणीक अर्हता १० वी उत्तीर्ण आहे.

४. वयोमर्यादा :-

**४.१ सामान्य उमेदवारांच्या बाबतीत दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे व २५ वर्षापेक्षा जास्त नसावे. म्हणजेच उमेदवार हा दिनांक २६ सप्टेंबर,१९९८ नंतरचा नसावा व उमेदवाराचा जन्म दिनांक २६ सप्टेंबर १९९१ पुर्वीचा नसावा.**

४.२ कमाल वयोमर्यादा खालील बाबतीत शिथीलक्षम आहे.

४.३ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत वयोमर्यादा १८ ते ३० राहील.

४.४ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्र.मासैक-१०-१०/प्र.क्र २७९/१०/१६-अ, दिनांक २० ऑगस्ट, २०१० अन्वये "माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणुकीकरिता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेला सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतका राहील".

४.४.१ शासन निर्णय क्रमांक राक्रीयो २००२/प्रक्र६८/क्रीयुसे-२/दिनांक ३० एप्रिल २००५ पात्र खेळाडुच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.

४.४.२सामान्य प्रशासन, शासन निर्णय क्रमांक प्रकल्प-१००६/मुस-३९६/प्रक्र५६/०६/१६-अ/दिनांक ३ फेब्रुवारी, २००७ धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांच्या बाबतीत खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता तसेच मागासवर्गीय उमेदवाराकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

४.४.३. शासन निर्णय महसुल व वनविभाग क्रमांक:बैठक २०१०/प्र.क्र.७/फ-९, दिनांक १६ ऑक्टोंबर २०१२ अनुसार वनविभागातील वनमजुरांना वयाची अट खालील प्रमाणे शिथीलक्षम राहील.

"वयाच्या ३३ वर्षानंतर (संबंधीत) वनमजुर जेवढी वर्ष वनविभागात कार्यरत आहेत तेवढया वर्षानी उदा. ज्यांनी ५ वर्ष सेवा केलेली असेल त्यांना वयाच्या ३८ वर्षापर्यंत व ज्यांनी १२ वर्ष सेवा केलेली असेल त्यांना वयाच्या ४५ वर्षापर्यंत"

४.३.४ सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदविधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय/ निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १०% समांतर आरक्षण लागु करण्यांत आले आहे व त्यांना सध्याच्या ४५ वर्षे वयोमर्यादेत आणखी १ वर्षाने वाढ करुन सदर सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यांत येईल. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पअंक-१००९/प्रक्र२००/२००९/१६-अ दिनांक २७ ऑक्टोंबर,२००९)

५. शारीरिक पात्रता.

| शारीरीक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (से.मी. मध्ये ) | १६३ | १५० |
| छातीचा घेर<br>अ) न फुगवता (से.मी. मध्ये )<br>ब) फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | लागू नाही |
| वजन (कि.ग्रॅ.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

अनुसूचित जमाती मधील उमेदवारासाठी खालील प्रमाणे शिथिलक्षम

| शारीरीक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (से.मी. मध्ये) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर<br>अ) न फुगवता (से.मी. मध्ये )<br>ब) फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>लागू नाही<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

वरील नमुद उंची, वजन व छातीचे मोजमापाकरिता **शासन पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/प्रक्र२८७/फ-४, दिनांक ३० जून २०११ मधील शासन पत्रातील निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१** मधील परीशिष्ट-३ मध्ये विहीत केलेली उंची व वजनाच्या तक्त्याप्रमाणे वनरक्षक या पदासाठीही उंचिच्या प्रमाणात वजन आवश्यक राहील.

५.१ दूर दृष्टी आणि जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याचे खालील मानक पूर्ण करतात.

**दूरदृष्टी**

| अधिक चांगला डोळा | | वाईट डोळा |
|---|---|---|
| | (सुधारलेली दृष्टी) | |
| ६/६ | | ६/१२ |
| किंवा | | किंवा |
| ६/९ | | ६/९ |

**जवळील दृष्टी**

| अधिक चांगला डोळा | | वाईट डोळा |
|---|---|---|
| | (सुधारलेली दृष्टी) | |
| J.१ | | J.११ |

**प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.**

५.२ शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या संबंधीचा आणि शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

५.३ नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यू व जखमी झालेले असे वनखबरे व वनकर्मचा-यांच्या मुलांना खाली नमुद केल्याप्रमाणे सुट देण्यात येईल.

१. उंची :- पुरुष आणि स्त्री उमेदवारासाठी २.५ से.मी. सूट.

२. छाती :- मोजणी आवश्यक नाही.

५.४ **खेळाडू प्रवर्ग :-** महसूल व वनविभाग शासन अधिसुचना दिनांक ३० जून २०११ अन्वये विहीत शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व वयोमर्यादेची अट पुर्ण करणा-या खेळाडूंना, विहीत उंचीमध्ये २.५ से.मी. इतकी सवलत देण्यात येईल.

५.५ **वनकर्मचा-यांच्या पाल्यांना शारिरीक अर्हतेत सवलत. :-** सेवेत कार्यरत असतांना मृत्यू पावलेल्या वनकर्मचा-यांच्या एका मुलास किंवा मुलीस शारिरिक पात्रतेत खालील प्रमाणे सवलत देण्यात येईल.
(ए) उंची :- पुरुष आणि स्त्री उमेदवारास २.५ से.मी.
(बी) छाती :- पुरुष उमेदवारांना २.० से.मी. न फुगवता व १.५ से.मी. फुगवून.

५.६ महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक:एफटीआर १५०४/प्रक्र१३६/फ-४, दिनांक २७ सप्टेंबर-२००७ अन्वये वनरक्षक भरती करिता अपंग आरक्षण लागू राहणार नाही.

६. **निवडीची पध्दत :-**

६.१ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ते शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व विशेष सुट (लागू असल्यास) करिता विहीत मापदंड इत्यादीची पुर्तता करतात किंवा कसे, याची शहानिशा करण्यात येईल.

६.२ जे उमेदवार शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादेची अट, उक्त पदाकरिता पात्रता पुर्ण करीत असतील अश्याच उमेदवारांची शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येईल. पुरुष व महिला उमेदवारांकरिता सर्वप्रथम अनुक्रमे ५ कि.मी./ ३ कि.मी. ची धावण्याची चाचणी व पुढील टप्प्यात अनुक्रमे २५ कि.मी./ १६ कि.मी. चालण्याच्या चाचणीचा समावेश राहील. धावण्याची चाचणी कमाल ३० मिनीटात व चालण्याची चाचणी कमाल ४ तासात पुर्ण करणे आवश्यक राहील. या प्रयोजनार्थ उमेदवारांनी खालील प्रपत्रात शासकीय वैद्यकीय अधिकारी कडून शारीरिकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. उक्त प्रमाणपत्र सादर न करणा-या उमेदवारांचा भरती मधील पुढील प्रक्रीयेकरिता विचार केला जाणार नाही.

**वनरक्षक भरती २०१६**

**शारीरिकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र**

**उमेदवाराचा फोटो**

प्रमाणित करण्यात येत आहे की, श्री/श्रीमती- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

रा. मु.पो. - - - - - - - - - - - - - - ता.- - - - - - - - - - - - - - - - - जिल्हा- - - - - - - - - - - - -

हे यवतमाळ वनवृत्तासाठी वनरक्षक भरती २०१६ मधील धावण्याचे चाचणीकरिता आवश्यक असलेले पुरुष *५ कि.मी./महिला ३ किं.मी. ३० मिनीटात पुर्ण करणे व शारिरीक क्षमता चाचणी करिता आवश्यक पुरुष *२५ कि.मी./महिला १६ कि.मी. ४ तासामध्ये पुर्ण करण्यास शारिरीकदृष्टया सुदृढ आहेत.

दिनांक — शासकीय वैद्यकीय अधिका-याचे नांव

ठिकाण — पदनाम व शिक्का

* लागू नसलेला मजकूर खोडावा

६.३ धावण्याची चाचणी पुरुष उमेदवारांनी ५ कि.मी. व महिला उमेदवारांनी ३ कि.मी. जास्तीत जास्त ३० मिनीटामध्ये पुर्ण करणे आवश्यक राहील. उक्त धावण्याची चाचणी स्पर्धात्मक स्वरुपाची व बाद पध्दतीची असेल. धावण्याचे चाचणी मध्ये प्रथम येणारे पदसंख्यच्या ३ पट एवढे उमेदवार पुढील फेरीसाठी पात्र ठरविण्यात येतील. उमेदवारांची संख्या निश्चीत करतांना विहीत करण्यात आलेले आरक्षणही विचारात घेण्यात येईल.

**उक्त चाचणीत**

| | |
|---|---|
| १. पहिल्या येणा-या ३ उमेदवारास (क्रमांक १ ते ३ वरील आलेले) यांना प्रत्येकी | - १० गुण |
| २. त्यानंतर येणा-या ५ उमेदवारास (क्रमांक ४ ते ८ वरील आलेले) यांना प्रत्येकी | - ०८ गुण |
| ३. त्यांनतर येणा-या ७ उमेदवारास (क्रमांक ९ ते १५ वरील आलेले) यांना प्रत्येकी | - ०६ गुण |
| ४. त्यांनतर येणा-या १० उमेदवारास (क्रमांक १६ ते २५ वरील आलेले) यांना प्रत्येकी | - ०४ गुण |
| ५. त्यानंतर येणा-या १५ उमेदवारास (क्रमांक २६ ते ४० वरील आलेले) यांना प्रत्येकी | -२.५ गुण |

याप्रमाणे गुणांचे भारांकन करण्यात येईल.

६.४ शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या टक्केवारीचे ८७.५% भारांकन व उर्वरीत १२.५% भारांकना करिता उक्त परिच्छेद क्रमांक ६.३ मधील धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण याची बेरीज करुन उमेदवाराची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

**उदाहरणार्थ :-** श्री "क" या उमेदवारांनी शैक्षणीक अर्हता परिक्षा (उच्च माध्यमीक प्रमाणपत्र परिक्षा) मध्ये एकूण निर्धारीत ५०० गुणापैकी ३०० गुण प्राप्त केले आहे. त्यांची टक्केवारी ६०% येईल, त्यांचे ८७.५% भारांकन म्हणजे ५२.५० ऐवढे येईल. तसेच ५ कि.मी./३ कि.मी. धावण्याच्या चाचणी परिक्षेत समजा तो ७ व्या क्रमांकावर आलेला आहे, तर उर्वरीत १२.५% भारांकन करीता ८ गुण मिळतील. याप्रमाणे गुणवत्ता यादी करीता त्यास वरील परिच्छेद क्रमांक मधील सुत्रानुसार त्यांना मिळणारे गुण = ५२.५०+८=६०.५०% अशी गणना केली जाईल.

६.५ उक्त चाचणीमधून पुढील पात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांचे ते विहीत शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा व विशेष सुट करिता दावे इ. चे बाबीची पुर्तता करतात किंवा कसे याची शहानिशा करण्यात येईल.

६.६ सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारीरिक पात्रता धारण करतात किंवा कसे, हे निश्चीत करण्याच्या दृष्टीने उमेदवारांची मोजमापे स्थानिक शासकीय वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात येतील.

६.७ शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादेची अट व शारीरिक पात्रता धारण करणारे आणि उपरोक्त प्रथम धावण्याची चाळणी मधून पुढील टप्प्यासाठी पात्र उमेदवारांची शारीरिक क्षमता चाचणी खालील प्रमाणे घेण्यात येईल.
शासन निर्णय महसूल व वनविभाग क्रमांक एफएसटी-०७/११/प्रक्र२८७/फ-४, दिनांक ३० जुलै-२०११ अन्वये पुरुष उमेदवारांना २५ कि.मी. चालणे व महिला उमेदवारांना १६ कि.मी. चालणे ४ तासात पुर्ण करणे अनिवार्य राहील. जे उमेदवार सदरची शारीरिक क्षमता ४ तासात पुर्ण करणार नाहीत असे उमेदवार निवडीस पात्र ठरणार नाहीत. तसेच उक्त चाचणीसाठी वेळापत्रकानुसार विहीत केलेल्या दिनांकास अनुपस्थित राहणारे उमेदवार निवडीस पात्र ठरणार नाहीत.

६.८ शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादेची अट, शारिरीक पात्रता धारण करणारे आणि वरिल परिच्छेद ६.७ मधील उल्लेखीत शारीरिक क्षमता चाचणी नंतर पात्र ठरलेले उमेदवारांची अंतीम निवडसुची तयार करण्यात येईल.

६.९ सदर निवडसुची एक वर्षापर्यत किंवा दुसरी निवडसुची तयार करणे यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत विधीग्राहय ठरेल, त्यांनतर ही निवडसुची व्यपगत होईल.

६.१० अंतीम निवडसुचीतील उमेदवार नियुक्ती/पदस्थापनेचे आदेशानुसार वनरक्षक पदावर रुजु न झाल्यास किंवा सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जात प्रमाणपत्र पडताळणी किंवा अन्य कोणतेही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळुन आल्यास, अशा उमेदवाराचे नियुक्ती आदेश रद्द करुन निवडसुचीतील प्रतिक्षा यादीवरील जेष्ठतेनुसार पुढील उमेदवारास नियुक्तीबाबत संधी देण्यांत येईल.

७. **आवेदन शुल्क :-**

उमेदवारांनी ONLINE पध्दतीने अर्जानुसार आवेदन शुल्क खालील प्रमाणे भरणा करावा.

| प्रवर्ग | आवेदन शुल्क |
|---|---|
| खुला | रु ३००/-<br>(अक्षरी रु तिनशे) |
| मागासवर्गीया करीता/<br>राखीव प्रवर्ग | रु १५०/-<br>(अक्षरी रु दिडशे) |
| माजी सैनिक | नाही |

Online पध्दतीने प्राप्त केलेली चालान भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये जाऊन भरणा करावी व चालानची प्रत अर्जदाराने जपुन ठेवावी. वनविभागाने मागणी केल्यास ती सादर करणे आवश्यक राहील.

ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत |
| १ | अर्ज ऑनलाईन करण्याचा कालावधी | २८.०९.२०१६ | १९.१०.२०१६ |

८. अर्ज करण्यांची पध्दत :-

८.१ अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यांत येणार नाही.

८.२ पात्र उमेदवाराला ऑनलाईन अर्ज maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २८.०९.२०१६ ते १९.१०.२०१६ या कालावधीतच सादर करणे आवश्यक आहे.

८.३ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चा फोटो (३ से.मी. x ४.५ से.मी.) स्वत:ची स्वाक्षरी (रुंदी ३ से.मी. x उंची २.५ से.मी.) आणि ३०० DPI Resolution आणि २० के.बी.पेक्षा कमी साईज होईल अशा पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. (फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी.) प्रवेश पत्रावर/अर्जावर दुस-याचा फोटो/स्वाक्षरी असल्यास उमेदवारांना अपात्र ठरविण्यांत येईल.

८.४ ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याच्या सविस्तर सुचना maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

८.५ विहीत पध्दतीने अर्ज सादर केल्यानंतर विहीत मुदतीत आवेदन शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

८.६ अर्ज ऑन लाईन अथवा महा ई सेवा केन्द्राद्वारेच भरता येईल. महा ऑन लाईन लिमीटेड या संस्थेकडुन प्रत्येक जिल्हयात महा ई सेवा केंन्द्र उभारण्यात आले आहे या महा ई सेवा केंन्द्राची यादी maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

८.७ उमेदवारांनी यापुर्वी maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर आपले खाते तयार केलेले असल्यास नव्याने खाते तयार करण्यांची गरज नाही.

८.८ त्यानंतर उमेदवारास प्रोफाईल निर्मीती मध्ये जाऊन स्वत:ची संपुर्ण माहिती भरावी लागेल. maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर यापुर्वी प्रोफाईल निर्मीतीमध्ये जाऊन स्वत:ची प्रोफाईलमधील माहिती कधीही अद्यावत करु शकतो.

८.९ उमेदवाराने युजर नेम व पासवर्डची नोंद करुन लॉगीन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंकवर क्लीक करावे. त्या कार्यालया अंतर्गत उपलब्ध जाहीराती अर्ज करण्यासाठी येथे क्लीक करा या संदेशासह दाखविल्या जातील.

८.१० क्लीक केल्यानंतर उमेदवार जाहीरातीत नमुद शैक्षणीक पात्रता/इतर बाबींची पुर्तता करत असेल तर अर्ज स्विकारला जाईल अन्यथा अर्ज अनधिकृत ठरतील.

**आवेदनशुल्क खालील दिलेल्या पर्यायानुसार अदा करता येईल.**

१. भारतीय स्टेट बँकेमध्ये चालानद्वारे २. नेट बँकींग ३. डेबीट कार्ड

९.०० **आवेदन शुल्काचा भरणा करण्याकरीता उमेदवारांनी खाली नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा :-**

१. युजर नेम व पासवर्डची नोंद करुन लॉगीन केल्यानंतर मुख्य पृष्ठाच्या वरील भागातील "माझे खाते" या लिंकवर क्लीक करावे.

२. "माझे खाते" या लिंकवर क्लीक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी आवेदन शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. पदासमोर Unpaid असे लिहीलेले असेल त्या ठिकाणी Pay Now अशी लिंक उपलब्ध असेल.

३. Pay Now या लिंकवर क्लीक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील १) ऑन लाईन पेमेंट २) चलानद्वारे

४. उमेदवाराने चलानद्वारे हा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणा-या चलानची प्रत घेऊन भारतीय स्टेट बॅकेच्या कोणत्याही शाखेत, बॅकेच्या कार्यालयीन वेळेत आवेदन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

५. चलानद्वारे आवेदन शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बॅक उमेदवारांकडुन आवेदन शुल्का व्यतिरीक्त रु.५०/- शुल्क म्हणुन आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चालानद्वारे शुल्क भरतांना शुल्क अधिक रु.५०/- (बॅकेचे सेवा शुल्क) भरावे लागेल.

६. ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बॅकमध्ये चलानद्वारे आवेदन शुल्क भरावयाचे आहे अशा उमेदवाराने अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बॅकेच्या कार्यालयीन वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**९.१** धावण्याच्या स्पर्धे अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्यांच्या "माझे खाते" मध्ये उपलब्ध करुन देण्यांत येईल. त्याची प्रत उमेदवाराने परिक्षेपुर्वी डाऊनलोड करुन घेणे व परिक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

९.२ शारीरीक दृष्टया सुदृढ असल्याचे प्रमाणपत्र तसेच प्रवेशपत्र धावण्यांचे चाळणी चाचणीचे वेळी उमेदवाराने सोबत आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय धावण्यांचे चाळणी चाचणीस प्रवेश दिल्या जाणार नाही.

९.३ विहीत पध्दतीने अर्ज सादर करुन आवेदन शुल्क भारतीय स्टेट बॅकेमध्ये चलानद्वारे भरावयाचे झाल्यास ऑन लाईन चलानची प्रत प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही दिनांक **१९.१०.२०१६** पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर संकेत लिंक बंद होईल.

९.४ चलानद्वारे आवेदन शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बॅकेमध्ये दिनांक २०.१०.२०१६ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहीत दिनांकानंतर आवेदन शुल्क भरल्यास वैध मानल्या जाणार नाही. तसेच आवेदन शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

९.५ उमेदवारांची धावण्याचे चाचणीचा दिनांक निश्चित झाल्यानंतर त्या अगोदर उमेदवारास प्रवेशपत्र त्यांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यांत येईल. त्याची प्रत उमेदवाराने धावणेचे चाळणी चाचणीपुर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाचणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

९.६ अर्ज भरण्यासंबंधी maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर संपर्क करावा व अर्ज भरण्यास काही तांत्रीक अडचण असल्यास ०२२/६१९१६४०० या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा

१०. **निवड प्रक्रियेचे वेळापत्रक maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. व त्यामध्ये वेळोवेळी केलेले बदल लागु राहतील.**

११. आरक्षण संबंधाने अद्यावत शासन धोरणानुसार लागणारी प्रमाणपत्रे अर्जातील तपशिला नुसार शैक्षणीक व इतर अर्हता तपासणीचे वेळी सादर करावी लागतील.

१२. **सर्वसाधारण अटी :-**

१२.१ सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता येणे आवश्यक आहे. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा.

१२.२ रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादी कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील वर नमुद प्रमाणे विहित केलेल्या पध्दती प्रमाणे अर्ज करावा.

१२.३ वनविभागात कार्यरत अधिसंख्य वनमजुरांनी वनरक्षक पदाकरीता पात्रतेनुसार विहीत केलेल्या पध्दती प्रमाणे **ऑनलाईन अर्ज सादर करावा.**

१२.४ पडताळणी अंती अर्ज रद्द ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे, जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार प्रादेशिक निवड समितीने राखुन ठेवले आहेत.

१२.५ सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यांत येईल.

१३. **इतर आवश्यक सुचना :-**

१३.१ उमेदवाराने जाहिरात काळजीपुर्वक वाचावी.

१३.२ उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज भरल्यास, अपात्र ठरेल.

१३.३ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सुचना दिली जाणार नाही.

१३.४ आरक्षित पदांच्या संदर्भात शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र/बीसीसी/२०११/ प्रक्र-१०६४/ २०११/१६ब दिनांक १२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासुन ६ महिन्याचे आंत सक्षम प्राधिका-याकडुन जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन नियुक्ती प्राधिका-याकडे सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा दिलेली नियुक्ती रद्द ठरेल.

१३.५ उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी रदद ठरेल.

१३.६ पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शरिरीकदृष्टया इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही व त्याबाबतची कोणत्याही स्वरुपाची नुकसान भरपाई देय राहणार नाही.

१३.७ ONLINE पध्दतीने उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी नमुद केल्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र नसल्याचे निदर्शनास आल्यास, तसेच अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळल्यास निवड प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारास अपात्र ठरविण्यांत येईल किंवा नियुक्ती दिल्यानंतर निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती रद्द ठरेल व त्यानंतर याबाबत उमेदवारांची कोणत्याही प्रकारची तक्रारीची दाखल घेतली जाणार नाही.

१३.८ उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाईल कमांक व ईमेल आयडी नोंद करतेवेळी काळजीपुर्वक भरावा.

१३.९ पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, ऑनलाईन अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने अथवा या कार्यालयाचे संकेतस्थळावर पाठवू नये.

१३.१० उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे व अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रुटी राहील्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवाराने अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी.

१३.११ वनरक्षक पदासाठी धावण्याची चाळणी चाचणी ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे तपासणी न करता घेतली जाणार असल्याने चाचणीचे आधारे उमेदवारांना निवडबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. जे उमेदवार उक्त पदाकरीता आवश्यक अर्हता व शारीरिक पात्रता पूर्ण करतात अश्यांचीच सामाजिक/समांतर आरक्षण निहाय अंतीम निवड केली जाईल.

१३.१२ भरतीसंबंधी वेळोवेळी maharecruitment.mahaonline.gov.in संकेतस्थळावर सुचना जाहीर करण्यात येईल. उमेदवारांनी नियमितपणे संकेतस्थळावर पाहणी करावी.

१३.१३ विहीत वयोमर्यादेतील ईच्छुक शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज संबंधीत विभागातील सक्षम प्राधिका-याच्या लेखी पुर्वपरवानगीने भरावे.

१३.१४ अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी खेळाचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिका-याचे असावे.

१३.१५ अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवारांनी आवश्यक

सर्व तपशिल स्वत:जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

**सदस्य सचिव**<br>**प्रादेशिक निवड समिती**<br>**तथा**<br>**उपवनसंरक्षक (प्रादेशिक)**<br>**यवतमाळ**